महाराष्ट्र शासन
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज
माजी सैनिक वसाहती जवळ, एम.आय.डी.सी.एरिया, विद्यानगर, मिरज-४१६ ४१०.
दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३) २२३१४२३ कार्यालय (०२३३) २२३१२६९
Email : gpmiraj@gmail.com Website : www.gpmiraj.ac.in

जा.क्र.:-शांतनिमि/विवि/उ.प.२०२१/ 1050 दिनांक:- 10 JUN 2021

**महत्वाचे परीपत्रक :-**

**विषय -उन्हाळी परीक्षा २०२१ असैधांतिक(Non- Theory) विषयांच्या परिक्षेबाबत....**

संदर्भ- १)मा. सचिव, म. रा. तं. शि. म. मुंबई यांचे कार्यालयाचे महत्वाचे परीपत्रक क्र. मरातंशिम/का-४०/लले/उप२१/२०२१/०७० दिनांक -०७/०६/२०२१

२)मा.प्राचार्य यांच्या कक्षात उन्हाळी परीक्षा २०२१ चे आयोजना बाबत दि.०८/०६/२०२१ रोजी झालेली बैठक

संस्थेतील सर्व विभाग प्रमुखांना सुचित करण्यात येते कि, उन्हाळी परीक्षा २०२१ सैधांतिक विषयांच्या परीक्षे बाबत संदर्भीय परिपत्रकान्वये सुचना देणेत आलेल्या आहेत. सर्व सुचना आपल्या विभागातील सर्व आधिकारी कर्मचारी यांच्या निर्दशनास आणुन देऊन सर्व सुचनांचे तंतोतंत अचुक पालन होईल या दृष्टीने अवगत करावे तसेच परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत विभागप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

संदर्भक्र.२ नुसार उन्हाळी परीक्षा २०२१ चे संस्था समन्वयक म्हणून श्री.बी.बी.लडगे, आधि.उपयोजित यंत्र यांनी काम पहावयाचे आहे. (विभाग प्रमुखांच्या सूचनेप्रमाणे)

(कॅप्टन डॉ. नि.पां.सोनजे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,मिरज.

प्रति:- सर्व विभाग प्रमुख/प्र.विभागप्रमुख/प्र.आधिकारी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

२/-सदरचे परिपत्रक आपले विभागातील आधिकारी, कर्मचाऱ्यांच्या व सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावे .

| | | | |
|---|---|---|---|
| १)स्थापत्य विभाग | २) यंत्र विभाग | ३) संगणक विभाग | ४) मेडि ईलेक्टॉनिक्स विभाग |
| ५)प्लास्टीक(पॉलिमर)विभाग | ६)उपयोजित यंत्रशास्त्र | ७)कर्मशाळाविभाग | ८)विज्ञान व मानव्यशास्त्र विभाग |
| ९) विद्युत विभाग. | | | |

प्रत:- १.श्री. काळे एस.पी. प्रोग्रॅमर यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे करीता.

२.श्री.बी.बी.लडगे.अधि.उपयोजित यंत्र यांना विभाग प्रमुखांमार्फत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२११०/ १८८

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२०२१/ 070 दि. 1-7 JUN 2021

**महत्वाचे परिपत्रक (गोपनीय)**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.

**विषय :- उन्हाळी परीक्षा २०२१ असैधांतिक (Non-Theory) विषयांच्या परीक्षेबाबत...**

संदर्भ :- १. मंडळाचे महतत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२१/२०२१/०६७, दि. २७.०५.२०२१.

२. मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०/ लले/उ.प.२१/२०२१/०६८, दि. ०१.०६.२०२१.

उपरोक्त संदर्भ १ च्या परिपत्रकानुसार उन्हाळी परीक्षा २०२१ प्रात्याक्षिक व लेखी परीक्षेचा कालावधी कळविण्यात आला होता. तसेच संदर्भ २ परिपत्रकान्वये सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांच्या उन्हाळी २०२१ परीक्षेच्या नियोजनाबाबत कळविण्यात आले आहे. या परिपत्रकाद्वारे सर्व संस्थांना प्रात्याक्षिक परीक्षा घेण्याकरिता महत्वाच्या सुचना देण्यात येत आहेत.

**१. परीक्षेचे ओळखपत्र ( Hall Ticket ) :-**

उन्हाळी परीक्षा २०२१ करीता विभागीय कार्यालयाकडुन परीक्षा अर्ज निश्चित केलेल्या सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा, मंडळ स्तरावर व संस्था स्तरावर ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने विद्यार्थी प्रवेशित संस्था यांना परीक्षा केंद्र घोषीत करण्यात येत आहे. सदर विद्यार्थ्यांचे ओळखपत्र ( Hall Ticket ) मंडळाचे संकेतस्थळावर तसेच Institute Login मध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील. संस्थांनी Institute Login मध्ये उपलब्ध असलेले ओळखपत्र बरोबर असल्याची खात्री करुन घ्यावी.

**२. सिटींग चार्ट :-**

उन्हाळी परीक्षा २०२१ करीता ॲपिअर होणा-या विद्याथ्याचे सिटींग चार्ट संस्थेच्या Institute Login मध्ये उपलब्ध आहेत. सर्व सत्र / वर्षातील परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांच्या Status नुसार दुरूस्ती आवश्यक असल्यास संबंधीत संस्थेने सदर दुरुस्ती करुन आवश्यक शेरे व संबंधीत दुरुस्तीकरिता आवश्यक कागदपत्रे जोडुन विभागीय कार्यालयामार्फत दुरुस्ती करुन घ्यावी.

| अ.क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| ०१. | संस्थांनी सिटींग चार्टमध्ये आवश्यक असलेली दुरूस्ती करुन कागदपत्रे जोडून विभागीय कार्यालयामार्फत निश्चित करण्याची अंतिम तारीख | दि. १५ जुलै २०२१ |
| ०२. | विभागीय कार्यालयाने आपल्या अंतर्गत असलेल्या सर्व संस्थांनी केलेली दुरुस्ती व कागदपत्रे तपासून निश्चित करण्याची अंतिम तारीख | दि. १६ जुलै २०२१ |

**३. असैधांतिक परीक्षा (Non Theory Examination) :-**

A. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र) तसेच शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील सर्व सत्र / वर्ष विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा मंडळाचे महत्वाचे परीपत्रक संदर्भ क्र. १ नुसार नमूद

केलेल्या कालावधीत घ्यावी. तसेच संबंधित विषयाच्या Teaching Examination Scheme मध्ये नमूद Maximum Marks करीता प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा घेण्यात यावी व त्यानुसार गुणपत्रिका भरण्यात याव्यात.

**B. विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरतांना निवडलेल्या चुकीच्या Optional / Elective विषयाबाबत कार्यवाही-**

१. प्रात्यक्षिक परीक्षेच्या चुकीच्या Optional विषयाच्या E-mark sheet मध्ये सदर विद्यार्थ्याच्या आसनक्रमांकासमोर **स्पेशल कोड ४०७** देण्यात यावा.

२. योग्य असलेल्या Optional विषयाकरिता मॅन्युअल मार्कशीट तयार करुन प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण भरण्यात यावेत.

३. सदर विद्यार्थ्याचा योग्य असलेला Optional विषय निवडून संस्थेच्या सिटींग चार्टमध्ये संबंधीत विषयाची दुरूस्ती करुन विभागीय कार्यालयामार्फत निश्चिती करावी.

४. संस्थांनी योग्य असलेला Optional विषय खालील नमुद Format मध्ये संस्थेच्या लेटर हेडवर प्राचार्यांच्या स्वाक्षरीने परीक्षा विभाग **desk40@msbte.com** व संबंधित विभागीय कार्यालयास Scan Copy व Excel Sheet ईमेल द्वारे **२८.०६.२०२१** पर्यंत पाठवावी.

| Sr. No. | Enrollment No. | Course Year Master | Seat No. S-2021 Exam | Wrong elective / optional paper code | Wrong elective / optional paper Name | Corrected elective / optional paper code | Corrected elective / optional paper Name |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |

**C. जुन्या अभ्यासक्रमातील लेखी विषयास I-Scheme मधील समकक्ष विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत सुचना :**

१. खालील प्रमाणे जुन्या अभ्यासक्रमातील Scheme नुसार I-Scheme मधील देण्यात आलेला समकक्ष विषय आहे.

| Sr. No. | Scheme | Paper Code and Paper Name | Equivalent Paper code and Paper Name in I-scheme | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1 | O/N/R/S/A/C/E/G | 17201- Communication Skills | 22009- Business Communication Using Computers | Practical Exam |
| 2 | A/B/S/T **(Mining Course)** | 0901- Communication Skills -I | 22009- Business Communication Using Computers | Practical Exam |
| 3 | A/B/S/T **(Mining Course)** | 0905- Engineering Drawing | 22049- Engineering Graphics | Practical Exam |

२. सदर विद्यार्थ्यांच्या Theory विषयाच्या गुण पत्रिका Non-Theory HOD login मध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील व विद्यार्थ्यांची यादी Report No. १४ मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

३. सदर विद्यार्थ्यांची परीक्षा Non-Theory परीक्षा कालावधीतच घेण्यात यावी व परीक्षेचे वेळापत्रक तयार करुन विद्यार्थ्यांना अवगत करावे.

४. सदर विद्यार्थ्यांकरिता परीक्षा I-Scheme मधील विषयकोड 22009 / 22049 Teaching scheme नुसार घ्यावी.

५. विद्यार्थ्यांचे गुण D4 Format नुसार भरावे व जुन्या अभ्यासक्रमातील विषयाच्या Teaching Scheme नुसार Maximum Marks पैकी रुपांतरीत करावे व विद्यार्थ्यांचे गुण गुणपत्रिकेत भरुन गुणपत्रिका निश्चित करावी.

**D. प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेबाबत महत्वाच्या सुचना :**

१) सर्व संस्थांना प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेबाबत आवश्यक असलेले User ID व Password <Institute code> principal@msbte.com या मेल आयडी वर पाठविण्यात येतील.

२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण मान्यताप्राप्त अभियांत्रिकी व औषध निर्माण शास्त्र अभ्यासक्रमातील **खालील नमूद अंतिम सत्र/वर्षा करीता अभ्यासक्रमाच्या Teaching scheme नुसार ज्या विषयांना बाह्य परीक्षक आवश्यक आहे, अशा बाह्य परीक्षकांची नेमणूक विभागीय कार्यालय यांचे मार्फत करण्यात येईल,** तसेच संस्था प्रमुखांनी संबंधीत विषयाकरीता अंतर्गत परीक्षकाची नेमणूक करावी.

- सहा सत्राच्या पदविका अभ्यासक्रमातील ---- सहावे सत्राकरीता.
- दोन वर्षाच्या औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमातील --- द्वितीय वर्षाकरीता.
- तीन वर्षाच्या मायनिंग अभ्यासक्रमातील --- तृतीय वर्षाकरीता.
- आठ सत्राच्या पार्टटाईम पदविका अभ्यासक्रमातील --- आठवे सत्राकरीता

३) अंतिम सत्र/वर्ष वगळून Teaching scheme नुसार ज्या विषयाकरीता बाह्य परीक्षकाची नेमणूक आवश्यक आहे अशा विषयांकरीता संबंधीत अभ्यासक्रमातील त्याच संस्थेतील जेष्ठ अध्यापकाची बाह्य परीक्षक म्हणून संस्था प्रमुखांनी नेमणूक करावी.

४) महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या (Non-AICTE) अभ्यासक्रमाकरीता सर्व सत्र/वर्षातील अभ्यासक्रमाकरीता Teaching scheme नुसार बाह्य परीक्षकांची नेमणूक आवश्यक आहे अशा सर्व विषयांकरीता संबंधीत अभ्यासक्रमातील जेष्ठ अध्यापकाची बाह्य परीक्षक म्हणून संस्थाप्रमुखांनी नेमणूक करावी.

५) संस्थेने प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा करीता वेळापत्रक तयार करावे व सर्व विद्यार्थ्यांना सुचित करावे.

६) प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा मंडळाने दिलेल्या कालावधीतच पूर्ण कराव्यात.

**E. Non- Theory E-Marksheet भरतांना खालील महत्वाच्या सुचनांचे पालन करावे-**

१. विभाग प्रमुख/अंतर्गत परीक्षक/बाह्य परीक्षक यांनी मंडळाने निर्देशित केलेले Proforma (D3/D4/D5) मध्ये आसन क्रमांकानुसार गुण भरतांना विषयाच्या Teaching scheme नुसार Max/Min गुण तपासावे. **ज्या विद्यार्थ्यांना साधारणत: ९०% व त्यापेक्षा जास्त दिलेले गुण योग्य आहे अथवा नाही याची खातरजमा करावी.** गैरहजर विद्यार्थी/Detained विद्यार्थी यांचे आसन क्रमांक बरोबर आहे याची तपासणी करुन घ्यावी व त्यानंतरच परीक्षकांनी Online E-mark sheet भरावी.

**२. उन्हाळी परीक्षा २०२१ पासून परीक्षकांनी E-mark sheet मध्ये गुण भरतांना ज्या विद्यार्थ्यांना साधारणत: ९५% व त्यापेक्षा जास्त गुण दिलेल्या विद्यार्थ्यांच्या आसनक्रमांकावर "The score is exceptionally high hence warrants audit of relevant records" असा Pop up message देण्यात येईल. परीक्षकांनी गुणपत्रिका confirm करण्यापूर्वी विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या गुणांची पुर्न:तपासणी करुन योग्य असल्याची खात्री करावी व गुणांमध्ये बदल असल्यास सुधारीत गुण E-mark sheet मध्ये भरावे.**

**३. परीक्षकांनी confirm केलेल्या गुणपत्रिकेवर ज्या विद्यार्थ्यांना Exceptionally High गुण देण्यात आले आहे त्यांची संख्या नमूद करण्यात येईल. संस्थेने सदर विद्यार्थ्यांचे संबंधीत विषयाचे सर्व Records योग्यरित्या जतन करावे. तसेच मंडळाच्या सुचने नुसार सर्व कागदपत्रे तपासणी करीता विहीत कालावधीत सादर करणे बंधनकारक राहिल.**

**४. एखाद्या संस्थेत विशिष्ट कोर्स/प्रोग्राम करीता विद्यार्थ्यांना दिलेले अंतर्गत गुण खुप जास्त अथवा कमी दिले गेले आहेत असे आढळल्यास अशी प्रकरणे मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील RG-११, (E) नुसार विशेष समितीपुढे ठेवली जातील. विशेष समितीने दिलेल्या सुचनांनुसार विद्यार्थ्याच्या निकालात सदर दुरुस्तीची अंमलबजावणी करण्यात येईल.**

५. सर्व परीक्षकांनी Check Print काढुन गुणपत्रिकेतील विद्यार्थ्यांचे आसन क्रमांकानुसार Proforma मधील गुण व गुणपत्रिकेतील गुण तपासुन गुणांमध्ये तफावत असल्यास गुणपत्रिका Confirm करणे अगोदर संबंधित परीक्षकांनी गुणदुरुस्ती करावी व पुन्हा Check Print काढुन गुण तपासावे. दिलेले गुण योग्य असल्यास परीक्षकांनी स्वाक्षरी करावी.

६. Check Print मधील गुण बरोबर असल्यास परीक्षकांनी गुणपत्रिका Confirm करावी व त्याची प्रिंट काढावी. त्यावर परीक्षकानी स्वाक्षरी करुन Marksheet लिफाफ्यात सिलबंद कराव्यात व मंडळाच्या नियमावलीनुसार जतन करण्यात याव्यात.

७. परीक्षकांनी गुणपत्रिका Confirm केल्यानंतर बाह्य परीक्षक नावामध्ये दुरुस्ती असल्यास Examiner Login मध्ये Edit Examiner Name या Link द्वारे (फक्त एकदाच) बाह्य परीक्षकाच्या नावामध्ये दुरुस्ती करता येईल. परंतु गुणपत्रिका प्रिंटवर निळ्या शाईच्या पेनने नावात दुरुस्ती करुन बाह्य परीक्षकानी स्वाक्षरी करावी.

८. **परीक्षकांनी गुणपत्रिका Confirm केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या गुणामध्ये दुरुस्ती करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.**

**F. Drawing विषयाच्या Theory परीक्षेबाबत सुचना :-**

संदर्भ क्र. २ च्या परीपत्रकातील मुद्या क्र. ३ नुसार नमूद केलेल्या Drawing विषयांच्या लेखी परीक्षा दिलेल्या कालावंधीत संस्थास्तरावर घेण्यात यावी. Drawing विषयांच्या परीक्षेकरिता Institute Login मध्ये Paper code निहाय विद्यार्थी संख्या उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच सदर विषयाच्या Theory गुणपत्रिका मंडळाच्या संकेतस्थळावर Online Activities मध्ये Theory e-mark sheet for institute level examination द्वारे उपलब्ध करुन देण्यात येतील व संबंधित User ID/Password प्राचार्यांच्या ईमेल आयडीवर देण्यात येतील. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्यानंतर Teaching Examination Scheme नुसार गुणपत्रिकेत गुण भरुन गुणपत्रिका कन्फर्म करावी.

**तरी संस्थेच्या प्राचार्यांनी वरील सर्व सुचना आपल्या संस्थेतील सर्व विभागप्रमुख तसेच परीक्षा आयोजनाबाबत सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची बैठक घेऊन सर्व सुचनांचे तंतोतंत अचुक पालन होईल या दृष्टीने अवगत करावे. तसेच परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.**

(डॉ. महेंद्र. रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत :- **माहितीकरिता व आवश्यक कार्यवाहीकरिता**

उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपुर, औरंगाबाद.